# उडत्या तबकड्यांचे रहस्य




– डॉ. जयंत नारळीकर

२४ जून, १९४७ रोजी केनेथ आर्नोल्ड नावाचा एक अमेरिकन व्यापारी स्वत:चे विमान चालवीत असताना त्याला तबकड्यांसारख्या काही वस्तू आकाशात दिसल्या. वॉशिंग्टन स्टेटमधील माउंट रेनियरजवळ त्या तबकड्या उत्तरेकडून दक्षिणेकडे उडत होत्या, असे विधान ह्या ३२ वर्षीय विमानचालकाने केले. त्याच्या अनुभवाला वर्तमानपत्रांतून बरीच प्रसिध्दी मिळाली आणि 'उडत्या तबकड्या' ही संज्ञा प्रचारात आली.

त्यानंतर अनेकांनी 'आपण देखील असेच काही तरी पाहिले' अशी विधाने केली. पृथ्वीवर कुठलीतरी परकीय शक्ती नजर ठेवून आहे – तिची याने आपल्या अंतराळात घिरट्या घालीत टेहाळणी करीत आहेत – आधुनिक विज्ञानयुगात अनाकलनीय अशा घटना आपल्याभोवती घडत आहेत – इत्यादी विधाने जेव्हा फार मोठ्या प्रमाणात केली जाऊ लागली तेव्हा अमेरिकन सरकारला ह्या उडत्या तबकड्यांची दखल घेणे भाग पडले.

१९४८ मध्ये 'प्रोजेक्ट साईन' ह्या नावाखाली अमेरिकन एअर फोर्सने ह्या प्रकारावर चौकशीला सुरुवात केली. १९४९ मध्ये 'प्रोजेक्ट ग्रज' आणि १९५२ मध्ये 'प्रोजेक्ट ब्ल्यूबुक' हेदेखील त्याच उद्देशाने हाती घेतलेले प्रकल्प होत. त्यांपैकी ब्लूबुक प्रकल्प १९६९ मध्ये बंद करण्यात आला. त्याखेरीज रॅण्ड कॉर्पोरेशन ह्या खासगी कंपनीला पण अमेरिकन एअर फोर्सने उडत्या तबकड्यांचा छडा लावण्याचे काम दिले. ह्या सर्वांपासून काय निष्पन्न झाले? तज्ज्ञांनी काढलेले निष्कर्ष असे होते –
१) उडत्या तबकड्यांपासून पृथ्वीला कसलाही धोका नाही.



**आकाशातून वेगाने जाणारा अशनी पाहून ते परकीय यान असावे असे बऱ्याच लोकांना वाटले!**

२) उडत्या तबकड्या किंवा तत्सम प्रकार पाहिल्याचे बहुतेक वृत्तान्त दृष्टिभ्रम किंवा खोट्या साक्षींवर आधारलेले दिसून आले.
३) उगवताना किंवा मावळताना दिसणारे गुरू, शुक्र, मंगळ आदी ग्रह, अशनी किंवा पृथ्वीवर बनलेलीच आकाशयाने पाहून, त्या परग्रहावरच्या उडत्या तबकड्या असाव्यात असा अनेकांचा गैरसमज झाला होता.

UFO (अन्आयडेंटिफाईड फ्लाइंग ऑब्जेक्ट) असे नाव साधारणपणे आकाशात दिसलेल्या अपरिचित वस्तूला दिले जाते. ती वस्तू कुठली हे निश्चितपणे सिध्द झाले की, ती UFO राहत नाही. अशातऱ्हेने UFO म्हणून गणलेल्या ९० टक्के गोष्टी वर सांगितल्याप्रमाणे ओळख पटून UFO राहिलेल्या नाहीत. असे असूनसुध्दा सामान्य माणूस UFO म्हणजे परकीय जीवसृष्टीकडून आलेली उडती तबकडी असे समीकरण मांडतो!

कधी कधी UFO ची छायाचित्रे प्रसिध्द होतात. त्यामागेही फसवाफसवीची उदाहरणे सापडली आहेत! अलीकडच्या तंत्रविकसित युगात बनावट छायाचित्रे प्रसिध्द झालेली आहेत. प्रथमदर्शनी एखाद्या अनोळखी आकाशयानाचे खरे वाटणारे छायाचित्र हे कार्डबोर्ड मॉडेलचेच घेतलेले छायाचित्र होते असे नंतरच्या तपासणीत सिध्द झाले आहे.

आणखी एका गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. अंतराळयुग सुरू झाल्यापासून मानवाने चंद्रापर्यंत मजल मारली. सूर्यमालेपलीकडे जाणारे यान अंतराळात धाडले. हे जर शक्य आहे तर एखाद्या अतिप्रगत जीवसृष्टीला इकडे याने पाठवायला का जमू नये? प्रथम अशी कल्पना करू की, अशी अतिप्रगत जीवसंस्कृती मंगळावर किंवा आपल्याच सूर्यमालेच्या एखाद्या लांबच्या ग्रहावर आहे. इतक्या जवळ असलेली वेगळी संस्कृती आपल्या प्रगतीची काहीच निशाणी दाखवत नाही ही आश्चर्याची बाब नव्हे का? अशा संस्कृतीला अगदी प्लूटोपासून पृथ्वीपर्यंतचा दौरा करणे, फार काय पृथ्वीशी संदेशाचे आदानप्रदान करणे शक्य झाले असते. अद्यापि, तसे घडून आलेले नाही. त्यामुळे ही संस्कृती इतक्या जवळ नसेल. जरा लांब जावे म्हटले तर शेजारचा तारा जवळ जवळ सव्वाचार प्रकाशवर्षे अंतरावर आहे. हे अंतर तोडणे ऊर्जेच्या दृष्टीने सध्याच्या मानवी तंत्रज्ञानाला शक्य नाही. समजा, एखाद्या अतिप्रगत संस्कृतीला ते शक्य आहे. असे असेल तर त्या संस्कृतीने वापरलेली वाहने – अंतराळयाने – आपल्या यानांपेक्षा निश्चितच बरीच वेगळी असणार. बैलगाडी आणि चंद्रावर जाणारे 'अपोलो–११' चे यान यांच्या बनावटीत जेवढा

फरक आहे त्याहून कितीतरी पटीने जास्त फरक आपल्या अंतराळतंत्रज्ञानात आणि असे ताऱ्यांमधले अंतर तोडू शकणाऱ्या अतिप्रगत तंत्रज्ञानात असले पाहिजे. तेव्हा त्या अतिप्रगत तंत्रज्ञानातून निर्माण होणाऱ्या अंतराळयानात आणि आपल्या सध्याच्या अंतराळयानात अक्षरशः जमीनअस्मानाचा फरक असायला पाहिजे. पण हा फरक ज्यांनी उडत्या तबकड्या पाहिल्याचा दावा केला आहे, त्यांनी वर्णन केलेल्या अंतराळयानात आणि आपल्या अंतराळयानात दिसून येत नाही. यातून दोनच पर्यायी निष्कर्ष निघू शकतात. एक तर ज्यांनी ह्या UFO चे दर्शन घेतले ते वास्तविक मानवनिर्मित यानेच पाहत होते. दुसरा पर्याय म्हणजे उडत्या तबकड्यांचे संपूर्ण चित्रच कल्पनारंजित आहे आणि ते चित्र रंगवणाऱ्यांची कल्पनाशक्ती मर्यादित होती असे म्हणावे लागते!

इतके सगळे सांगितल्यावर एक प्रश्न उद्भवतो. उडत्या तबकड्या किंवा तत्सम वस्तूंबद्दल जनसामान्यांत इतके आकर्षण



**दोन शाळकरी मुलांनी कार्डबोर्ड मॉडेलची बेमालूम छायाचित्रे घेऊन ते खरे अंतराळयान असल्याचे भासवले आणि अनेकांना बनवले. ही घटना अमेरिकेतली! वरील चित्रात ते मॉडेल झाडाखालच्या आकाशात दिसत आहे.**

का? याचे उत्तर देण्यासाठी भौतिकशास्त्राऐवजी मानसशास्त्राचा आधार घ्यायला पाहिजे. अद्भुत, सकृतदर्शनी अनाकलनीय, चमत्कारिक अशा गोष्टींबद्दल, घटनांबद्दल, मानवाला प्रथमपासूनच आकर्षण वाटत आले आहे. अशी गोष्ट नजरेस आल्यावर त्याचे उत्तर शोधण्यासाठी दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग शास्त्रीय दृष्टिकोनाशी निगडित आहे. जी माहिती विज्ञानाने प्रयोगाद्वारे प्रस्थापित केली आहे तिच्यावर आधारलेल्या सिध्दान्ताद्वारे अशा गोष्टीची कारणमीमांसा करणे – किंवा करायचा प्रयत्न करणे – हे हा मार्ग सुचवतो. मनुष्य हा 'विचारवंत', 'बुध्दिवादी' इत्यादी विशेषणे स्वतःला लावून घेतो. तरीपण हा मार्ग अवलंबणारे फारच थोडे असतात. उलट एखादे अद्भुत पाहिल्यावर त्यामागे कुठली तरी (इष्ट किंवा अनिष्ट) शक्ती असली पाहिजे – ही गोष्ट आपल्याच काय पण प्रस्थापित विज्ञानाच्याही कक्षेबाहेरची आहे असाच समज बहुतेक लोक करून घेतात. चित्रातून राख बाहेर येणे किंवा इंपोर्टेड घड्याळे हवेतून अवतरणे किंवा मनातले प्रश्न ओळखणे इत्यादी घटनांतून ज्या भोळ्या जीवांना (त्यांना 'सूज्ञ' म्हटल्यास त्या शब्दाचा अर्थ बदलला पाहिजे!) दिव्यत्वाची प्रचिती येते, त्यांनी 'UFO म्हणजे अतिप्रगत जीवांकडून आलेले यान' असे समीकरण मांडल्यास नवल काय!

ह्या भोळ्या प्रवृत्तीचा कसा फायदा घेतला जातो आणि वैज्ञानिक परीक्षणाने हे कसे उघडकीस आणण्यात येते, याची अलीकडे घडलेली दोन उदाहरणे पहा. १९७०-८० च्या दशकात इस्रायल येथील युरी गेलरच्या 'पराक्रमा' नंतर मानसिक शक्तीने बरेच 'नवीन' करून दाखवता येते, असा भ्रम जनसामान्यांत प्रचलित झाला होता. चमचे वळवणे किंवा तत्सम प्रकार लांबून मानसिक शक्तीने करता येतात असा दावा गेलर आणि इतरांनी केला होता. परंतु शास्त्रीय परीक्षणपध्दती वापरल्यावर, या दाव्यांमध्ये तथ्य नसल्याचे दिसून आले. अमेरिकेतील जेम्स रॅण्डी या जादूगाराने हे 'चमत्कार' करून दाखवले आणि हा हातचलाखीचा प्रकार आहे हे सांगितले.

